नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०८/०३/२०२६ (रविवार)

---

## जबरीने पैसे हिसकावुन नेणारा आरोपी अटक
## दोन लाख रोख रक्कम असा संपुर्ण मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण कामगिरी

पोलीस स्टेशन सावनेर :— पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत फिर्यादी नामे उमाजी बाळकृष्ण निंबाळकर, वय ७६ वर्ष, रा. वार्ड नं. २, बोरूजवाडा, ता. सावनेर यांनी तक्रार दिली की, दिनांक १३/०१/२०२६ रोजी फिर्यादी यांनी सेंट्रल बॅक ऑफ इंडीया सावनेर येथुन पैसे काढले व बस स्टॅाप सावनेर येथे पोहचले असता दोन अनोळखी इसमांनी मोटरसायकल वर येवुन फिर्यादीचे हातातील पिशवी ज्यात २,००,०००/—रू. व ०३ बॅकेचे पासबुक असलेली पिशवी जबरदस्तीने हिसकावुन नेले व मोटरसायकलने पळुन गेले. अश्या फिर्यादीचे तोंडी रीपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे अपराध क्रमांक १९/२६ कलम ३०९(४), ३(५), भान्यासं गुन्हा नोंद आहे.

सावनेर पोलीसांसह स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांनी सुध्दा सदर गुन्हयाचा समांतर तपास सुरू केला. समांतर तपासादरम्यान तांत्रिक पुराव्यावरून मिळालेल्या माहितीचे आधारे सदर गुन्हयात **रिषी अनुपसिंग सिसोदीया, रा. गाव कडिया, ता. पचौर, जि. राजगढ, (मध्यप्रदेश)** हा आरोपी असल्याची माहीती प्राप्त झाली होती. **स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला आज दिनांक ०८/०३/२०२६ रोजी** गोपनिय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, **रिषी अनुपसिंग सिसोदीया, रा. गाव कडिया, ता. पचौर, जि. राजगढ, (मध्यप्रदेश)** हा नागपूर रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या बस स्थानकावरून बसने आपल्या गावाकडे जाणार आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळताच पथकाने स्टाफसह बस स्थानकाजवळ सापळा रचुन

आरोपीस ताब्यात घेऊन त्याच्याकडे कौशल्यपूर्ण विचारपूस केली असता दोन महीन्यापुर्वी त्याने त्याच्या साथीदारासह साथीदाराच्या दुचाकी वाहनाने गुन्हा केल्याचे सांगितले. आरोपीस ताब्यात घेऊन त्यांचेकडुन **नगदी २,००,०००/— रूपयाचा मुद्देमाल केला.**

**आरोपी रिषी अनुपसिंग सिसोदीया, वय २० वर्षे, रा. गाव कडिया, ता. पचौर, जि. राजगढ, (मध्यप्रदेश) याला अटक करण्याची प्रक्रीया सुरू आहे. पुढील तपास सावनेर पोलीस करीत आहेत.**



# खापा पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू व्यवसायातील सराईत गुन्हेगारास नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन खापा हदद्दीतील अवैध दारू व्यवसायातील सक्रिय आरोपी **नामे मोहन बाबुलाल ठाकुर, वय ६० वर्ष, रा. कोदेगाव, ता. सावनेर जि. नागपूर** याला महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

सराईत गुन्हेगार नामे **मोहन बाबुलाल ठाकुर, वय ६० वर्ष, रा. कोदेगाव, ता. सावनेर जि. नागपूर** याचेवर अवैध दारू विक्रीचे **अनेक गुन्हे नोंद** आहे. नमुद आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे गुन्हेगार **मोहन बाबुलाल ठाकुर, वय ६० वर्ष, रा. कोदेगाव, ता. सावनेर जि. नागपूर** यांचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ)(ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव खापा पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, **सावनेर यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी मोहन बाबुलाल ठाकुर, वय ६० वर्ष, रा. कोदेगाव, ता. सावनेर जि. नागपूर यास ०३ महीन्याकरीता नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.**

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



हद्दपार आरोपी मोहन बाबुलाल ठाकुर

## खुन करणाऱ्या आरोपीला अटक
## उमरेड पोलीस नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन उमरेड :— दिनांक ०७/०३/२०२६ रोजी फिर्यादी गणेश व्यकंटराव सोनवाने, वय ५१ वर्ष, रा. सोनेझरी, उमरेड यांनी पोलीस स्टेशन उमरेड येथे तक्रार दिली की, दिनांक ०७/०३/२०२६ रोजी चे १५.०० वा. चे १५.३० वाजेच्या दरम्यान फिर्यादी याचे घराचे मागील भिंतीचे प्लास्टर व संडास दुरूस्तीचे काम सुरू असताना फिर्यादीचे घराचे मागे राहणारा **आरोपी नामे पवन मनोहर लोनबले, वय ३० वर्ष, रा.**

**सोनझरी ता. उमरेड** हा बाधंकामाचे ठिकाणी येऊन बाधंकामास विरोध करून फिर्यादीचे लहान भाउ मृतक नामे कैलास व्यकंटराव सोनवने, वय ३८ वर्ष, रा. सोनेझरी, यांचेशी भांडण करून चाकुने कैलास  सोनवने यांचेवर वार करून जिवानीशी ठार केले.

पोलीसांनी सदर प्रकरणात **आरोपी नामे पवन मनोहर लोनबले, वय ३० वर्ष, रा. सोनझरी ता. उमरेड** याला तात्काळ ताब्यात घेत दिनांक ०७/०३/२०२६ रोजी अटक केली आहे.

## अवैधरीत्या हुक्का ओढणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद उपविभागीय पोलीस अधिकारी,सावनेर विभाग आणि पथक यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर :—** दिनांक ०६/०३/२०२६ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग, यांचे पथक  सावनेर पोलीस स्टेशन परिसरात पेट्रोलींग करीत असता गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, पोस्टे सावनेर हद्दीतील ड्राईव्ह ॲड डाईन ( डि.एन.डी ) कवडस येथे सार्वजनिक ठिकाणी काही इसम हुक्का सेवन करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ नमुद घटनास्थळी रेड कारवाई केली असता काही इसम हे नमुद घटनास्थळी अवैधरीत्या हुक्का सेवन करताना मिळुन आले. हुक्का पिणारे **आरोपी नामे १) कुणालसिंग गुरविंदरस्प्रिंग मुडे, वय ३३ वर्ष, रा. प्लॉट नं १८८, फलॅट नं ४०३, हनी चैताली अपार्टमेंट पुनम हॉल चे मागे वर्धमान नगर, भांडेवाडी नागपुर २) गुर्सिमरनसिंह गुरविंदरस्प्रिंग मुडे, वय २५ वर्ष, रा. प्लॉट नं १८८, फलॅट नं ४०३, हनी चैताली अपार्टमेंट पुनम हॉल चे मागे, वर्धमान नगर, भांडेवाडी नागपुर ३) अम्रतसिंग उर्फे जसजितसिंग चाणसिंग सबरवाल, वय २४ वर्ष, रा. प्लॉट नं  १०२०, इंदोरा चौक, बुध्दनगर कामठी रोड नागपुर ४) रणविरसिंग इकबालसिंग विरधी, वय ३४ वर्ष, रा फ्लॅट नं ३०१, सोना पॅलेस, दिक्षीत नगर नारी रोड ५) सुरज रामपथ रबडे, वय २५ वर्ष, रा.**

**पाटणसांवगी खदान, ता. सावनेर** हे हुक्का सेवन करताना मिळुन आल्याने **त्यांना ताब्यात घेवुन** सदर हुक्का पिण्याचे साहीत्य कोठुन आणले या बाबत विचारणा केली असता त्यांनी ( डि.एन.डी ) हॉटेल चे चालक मालक आरोपी क्रं ६) **सिध्दार्थ अग्रवाल, वय ३८ वर्ष, रा. नागपुर यांनी हुक्का आणि** साहीत्य पुरविल्याची माहीती दिली. पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातून हुक्का पॉट इतर साहित्य असा एकुण ७००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरूद्ध कलम २२३ भा.न्या.सं. २०२३ सहकलम ४, २१ सिगारेट इतर तंबाखू उत्पादने जाहीरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वानिज्य व्यवहार आणि उत्पादन पुरवठा व विवरण यांचे विनी अधिनियम कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरीत्या हुक्का ओढणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद
## उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग
## आणि पथक यांची कामगिरी

पोलीस स्टेशन कळमेश्वर :— दिनांक ०८/०३/२०२६ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग, यांचे पथक पोलीस स्टेशन कळमेश्वर परिसरात पेट्रोलींग करीत असता गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, पोस्टे कळमेश्वर हद्दीतील हॉटेल ॲटमॉस्पिअर गोंडखैरी येथे सार्वजनिक ठिकाणी काही इसम हुक्का सेवन करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ नमुद घटनास्थळी रेड कारवाई केली असता काही इसम हे नमुद घटनास्थळी अवैधरीत्या हुक्का सेवन करताना मिळुन आले. हुक्का पिणारे **आरोपी नामे १) पारस संजय जैन, वय २८ वर्ष, २) यश सुशील जैन, वय २८ वर्ष, दोन्ही रा. इतवारी नागपूर ३) संकेत सोमेश्वर काळे, वय २८ वर्षे, रा. सक्करदरा नागपूर ४) साहिल राजेश सनकत, वय २८ वर्ष, रा. गोकुलपेठ वाल्मिकी नगर, नागपूर** हे हुक्का सेवन करताना मिळुन आल्याने त्यांना सदर हुक्का पिण्याचे साहीत्य कोठुन आणले या बाबत विचारणा केली असता त्यांनी ॲटमॉस्पिअर हॉटेल चे चालक मालक आरोपी क्रं ५) **मोहम्मद अस्लम खान उर्फ अशफाक खान वय ४९ वर्षे, रा. दिनशा फॅक्टरी जवळ पटेल**

**नगर, बोरगाव, नागपुर** यांनी साहीत्य पुरविल्याची माहीती दिली. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातून हुक्का पिण्याचे साहित्य असा एकुण १५००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद ५ आरोपीतांविरूद्ध कलम २२३ भा.न्या.सं. २०२३ सहकलम ४, २० सिगारेट इतर तंबाखू उत्पादने जाहीरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वानिज्य व्यवहार आणि उत्पादन पुरवठा व वितरनाचे नियमन अधिनियम कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने